पंडित दीनदयाल उपाध्यक्ष शिक्षण संस्था संचलित

## श्री संत  सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता.  फुलंब्री, जिल्हा- छत्रपती संभाजीनगर – ४३११११

# आचार्यकुल प्रबोधिनी

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२४-२५

समिती प्रमुख

**डॉ. महेश थोरात**

प्राचार्य

**डॉ. सुभाष टकले**

## आचार्यकुल प्रबोधिनी समितीचे उद्देश

- संशोधनासाठी प्रेरणा मिळावी म्हणून शोधनिबंध वाचनाचे आयोजन करणे.
- नाविन्यपूर्ण काही उपक्रम / योजना माहिती व्हाव्यात या उद्देशाने अभ्यास सहलीचे आयोजन करणे.
- यशवंत प्राध्यापकांचा सत्कार करून त्यांना अभिप्रेरन देणे
- विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्य करणे.
- परस्परात सहकार्याची भावना वाढवी यासाठी कर्मचाऱ्यांचे वाढदिवस साजरा करणे.
- संस्थेने आयोजित केलेली सहविचार बैठक (उद्बोधन शिबिर) आणि मासिक ज्ञानसत्रामध्ये उपस्थित राहून ज्ञानार्जन करने.

**अनुक्रमाणिका**

- संशोधन पेपरचे वाचन
- शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सहल आयोजन
- यशवंत प्राध्यापकांचा सत्कार आणि अभिष्टचिंतन
- पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना
- संस्था वर्धापन दिन
- सहविचार बैठक
- कार्यक्रमाची छायाचित्रे

**संशोधन पेपरचे वाचन**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आचार्यकुल प्रबोधनीच्या वतीने खालील प्राध्यापकांनी शोधनिबंधाचे सादरीकरण केले.

| अ. क्र | दिनांक | प्राध्यापकांची नावे | विभाग | विषय |
|---|---|---|---|---|
| 1 | 14/10/2024 | डॉ दिनेश कचकुरे | इतिहास विभाग | सह्याद्री आणि छत्रपती शिवाजी महाराज |
| 2 | 14/10/2024 | डॉ भारत कुबेर | राज्यशास्त्र विभाग | जागतिक बदलानुसार भारताचे जागतिक धोरण |
| 3 | 22/01/2025 | डॉ. संजीवकुमार पांचाळ | मराठी विभाग | मराठी भाषेच्या अभिजात दर्जाची वाटचाल |
| 4 | 23/01/2025 | डॉ. अश्विन रांजणीकर | इंग्रजी विभाग | Daya Pawar's Baluta: a Testament of dalit identity and resistance |
| 5 | 23/01/2025 | डॉ. नितीन माळेगावकर | वाणिज्य विभाग | Unemployment problem and persons with disabilities in Marathwada region of India |
| 6 | 01 /02/2025 | प्रो. डॉ. सुरेश मुंडे | हिंदी विभाग | भारतरत्न नानाजी देशमुख एक प्रख्यात समाजसेवक एवं राजनीतिज्ञ |
| 7 | 1 /02/2025 | प्रो. डॉ. दत्तात्रय येडले | हिंदी विभाग | हिंदी मराठी भक्ती साहित्य की प्रासंगिकता |
| 8 | 8/02/2025 | प्रो. डॉ. रामकिसन लोमटे | राज्यशास्त्र विभाग | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कल्पनेतील लोकशाही |
| 9 | 8 /02/2025 | प्रा. विजय पांडे | इतिहास विभाग | फारसी भाषेचा मराठीतील व्यक्तीनामे आडनावातील प्रभावांचा 91 कलमी बकरीच्या संदर्भात अभ्यास |
| 10 | 18/03/ 2025 | डॉ. संदीप जगताप | शारीरिक शिक्षण विभाग | भारतीय दृष्टिकोनातून शारीरिक शिक्षण आणि आरोग्य |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 11 | 18 /03/2025 | प्रो. डॉ. राजश्री पवार | मराठी विभाग | तुकाराम बुवांच्या गाथेतील विरक्तीपर निवडक अभंगाचा आस्वाद . |
| 12 | 7 /04 /2025 | प्रो. डॉ. पांडुरंग कल्याणकर | अर्थशास्त्र विभाग | Tourism development in Rajasthan challenges and strategies solutions |
| 13 | 7 /04 /2025 | डॉ. महेश थोरात | वाणिज्य विभाग | Strategy and Management are defining the future of business. |

**संशोधन पेपरचे वाचन करतांनाचे काही छायाचित्र**




डॉ. संजीवकुमार पांचाळ




डॉ दिनेश कचकुरे




डॉ भारत कुबेर



डॉ. अश्विन रांजणीकर




डॉ. नितीन माळेगावकर





प्रो. डॉ. सुरेश मुंडे




प्रो. डॉ.  दत्तात्रय येडले




प्रा. विजय पांडे




डॉ. संदीप जगताप




प्रो. डॉ. राजश्री पवार




डॉ. महेश थोरात



प्रो. डॉ. रामकिसन लोमटे




प्रो.डॉ.पांडुरंग कल्याणकर

**शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी सहलीचे आयोजन:**

शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये महाविद्यालयातील आचार्य कुलप्रबोधनी अंतर्गत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांची सहल / प्रकल्प भेट रविवार, दिनांक 1 डिसेंबर 2024 रोजी खुले करागृह पैठण याठिकाणी आयोजित केलेली होती.

पैठण येथील खुले जिल्हा कारागृह या प्रकल्पाची भेट घेण्यासाठी अधीक्षक बाल राजेंद्र निमगडे यांची रीतसर परवानगी घेण्यात आली. त्यांनीही प्रकल्प भेटीसाठी महाविद्यालयास परवानगी दिली. नियोजित तारखेला सकाळी दहा वाजता आम्ही सर्व पैठण येथील खुले जिल्हा कारागृह परिसरात पोहोचलो.

अधीक्षक बाल राजेंद्र निमगडे साहेब यांनी आम्हाला त्यांच्या कार्यालयात बोलावून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले आणि सर्व कर्मचाऱ्यांचे शब्दसुमनाने स्वागत केले. डॉ. महेश थोरात यांनी सर्वांचा परिचय करून दिल्यानंतर महाविद्यालयाकडून अधीक्षक साहेबांचे ग्रंथ देऊन स्वागत करण्यात आले. चहापाणी झाल्यानंतर अधीक्षक साहेबांनी कारागृहातील नियम, शिस्त कारागृहाच्या स्थापनेपासून तर कारागृहातील सर्व क्रियांविषयी, कायद्यांच्या दिनचर्याविषयी सविस्तर माहिती सांगितली. त्याचप्रमाणे कारागृहातील सर्व प्रकल्पांना भेट दिली.

कारागृहातील बंदीना यंत्रमाग, लोहारकाम, धोबीकाम, सुतारकाम, शिंपीकाम, जेंट्स पार्लर, चित्रकला, टू व्हीलर गॅरेज इत्यादी गोष्टींचे त्यांना प्रशिक्षण देण्यात येते.

त्याचप्रमाणे बंदीनमार्फत केली जाणारी कारागृहातील शेती एक अनन्य साधारण प्रकल्प आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारागृहात गांडूळ खत प्रकल्प, सेंद्रिय खत प्रकल्प, कंपोस्ट खत प्रकल्प राबविण्यात येतो. उत्पादित खत कारागृहाच्या शेतीत वापरण्यात येते व उरलेले मार्केटमध्ये विकण्यासाठी पाठवण्यात येते. सदर खत कसे तयार करावे याचे बंदींना प्रशिक्षण देण्यात येते. या प्रकल्पामुळे बंदी प्रशिक्षणाबरोबर कारागृहास उत्पन्न देखील मिळते. कारागृहातील कैद्यांनी पिकवलेल्या शेतीतून राज्यभरातील कारागृहात अन्नधान्य पुरविले जाते. मुंबई, पुणे मार्केटमध्ये भाजीपाला पाठवला जातो. क्षणिक रागातून हातून गुन्हा घडलेल्या कैद्यांना चांगला माणूस बनून पुन्हा समाजात पाठविण्याची उद्देशपूर्ती खोल्या कारागृहास सफल होत असल्याचे आम्हास दिसून आले.

आम्ही ज्या दिवशी गेलो त्या दिवशी अर्थात एक डिसेंबर रोजी एड्स दिन असल्याकारणाने आमच्यासारखेच एक डॉक्टरांची टीम सदरील कारागृहास कैद्यांना एड्स रोगाविषयी जनजागृती करण्यासाठी उपस्थित होती. दोन कायद्यानी स्वतःचे मनोगत सदरील कामांमध्ये व्यक्त केले.सदरील कार्यक्रमास आम्हीही हजेरी लावून कार्यक्रमास उपस्थित राहिलो.

एका चांगल्या प्रकल्पाला भेट देऊन आयुष्यात संयम, शांती, सबुरी किती महत्त्वाचे आहे. रागावर नियंत्रण किती महत्त्वाचे आहे. हे प्रत्यक्ष अनुभूतीने लक्षात आले. खरोखरच प्रकल्पला भेट देऊन आनंद वाटला. या प्रकल्प भेटीचा आम्हाला नक्कीच आमच्या संशोधन आणि विस्तार कार्यास फायदा होईल हे नक्की..

कारागृहातील भेटीनंतर पैठण येथील नाथ मंदिरात नाथांचे दर्शन घेऊन नाथसागरावर थोडा वेळ घालवला आणि नंतर परतीचा प्रवास धरला.

महाविद्यालयातील        जणांनी सदरील प्रकल्पास दिली.



छत्रपती संभाजीनगर जिल्हा 02-12-2024

# खुल्या कारागृहात एड्स जनजागृती

प्रतिनिधी | पैठण

पैठण येथील खुले जिल्हा कारागृहात रविवार रोजी जागतिक एड्स निर्मूलन दिनानिमित्त एड्सवर जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. खुल्या कारागृहाचे अधीक्षक बालराजेंद्र निमगडे, बबलू गायकवाड यांनी यावेळी खुल्या कारागृहातील बंदींना एड्स संदर्भात मार्गदर्शन केले. पैठण खुले जिल्हा कारागृहातील बंद्यांकरिता शासकीय ग्रामीण रुग्णालय, पैठण व श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री यांचे विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला डॉ. एस.आर. टकले, प्राचार्य डॉ. कल्याणकर, उपप्राचार्य डॉ. महेश थोरात, प्राध्यापक संत सावता माळी महाविद्यालय बबलू गायकवाड, हिवाळे आदी प्रमुख उपस्थिती होती शिवाय जयश्री भिसे, विभा दाभाडे यांनी . आजाराबाबत मार्गदर्शन करून समुपदेशन केले.

## बंदीची तज्ज्ञांकडून तपासणी

यावेळी कार्यक्रमावेळी उपस्थितांनी १० मिनिट ध्यानसाधना केली. शासकीय ग्रामीण रुग्णालय, पैठण यांचेमार्फत कारागृहातील बंदीकरिता शिबिरात वैद्यकीय तज्ज्ञांमार्फत एच.आय.व्ही. तपासणी करण्यात आली. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना खुले कारागृहाचे बाळराजेंद्र निमगडे, कारागृह अधीक्षक यांनी करून डॉ. प्रा. रामकिसन लोमटे यांनी सूत्रसंचालन करून समारोप केला.

**छायाचित्र**

शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रकल्प भेटीदरम्यान पैठण येथील खुले कारागृह.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले हे अधीक्षक बालराजेंद्र निमगडे यांचे ग्रंथ देऊन स्वागत करताना






कारागृहातील सर्व क्रियांविषयी, बंदीच्या दिनचर्याविषयी सविस्तर माहिती सांगताना अधीक्षकसाहेब













कारागृह परिसर


खुले जिल्हा कारागृह पैठण द्वारा संचलित
कारागृह उद्योग नगरी
फेब्रीकेशन
इस्त्री


खुले जिल्हा कारागृह पैठण द्वारा संचलित
जेन्टस पार्लर
टेलर


Shot on OnePlus
By DR MAHESH
01/12/2024
1:05 pm

## यशवंत प्राध्यापकांचा सत्कार आणि अभिष्टचिंतन:

डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी जयपुर राजस्थान येथे आयोजित अखिल भारतीय अर्थशास्त्र परिषदेत उत्कृष्ट संशोधन पेपर सादरीकरणाचा पुरस्कार प्राप्त झाला त्यामुळे आचार्य कुल प्रबोधनी अंतर्गत त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. नितीन माळेगावकर यांना सहयोगी प्राध्यापक पदी पदोन्नती मिळाली त्यामुळे त्यांचे आचार्य कुल प्रबोधिनी अंतर्गत सत्कार करण्यात आला.

त्याचप्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा त्यांच्या वाढदिवसानिमित्त आचार्य कुलप्रबोधनीच्या वतीने वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.






## पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजना:

आचार्य कुलप्रबोधनीच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पंडित दीनदयाल शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांनी ४८५००/-रुपयाचे योगदान दिले. या रकमेच्या माध्यमातून महाविद्यालयातील ६२ विद्यार्थ्यांना पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती देऊन आर्थिक मदत करण्यात आली.

The Chikhli Urban Co-Op Bank Ltd;Chikhli — Page 1 of 1
FULAMBRI BRANCH — User Id VVK
R009004 - Statement of Account for Checking Account — Printed On 19/07/2024 11:59:10

Branch: 13- FULAMBRI BRANCH
Account Name: SB/2403- PANDIT DINDAYAL UPPADHYA
Address: H.O.SAMBAJI VIDHYALYA.N.5 CIDC O DIST AURANGABAD MAHARASHTRA PHULAMBRI- 431111

Joint Names:
MR BAGADE HARIBHAU KISANRAO
MR PATEL DEVJIBHAI PARBHAT
MR GAWANDE NIVRUTI YASHWANTRAO
MR HAMBARDE VIVEK VISHNU

Statement of account from 01/07/2024 to 18/07/2024

Opening Balance: 116,993.27

| POSTDT | PARTICULARS | INSTNO | DRAMT | CRAMT | Balance |
|---|---|---|---|---|---|
| 16/07/2024 | BY CLG. KALYANKAR PANDURANG MAROTRAO | 000000338524 | 0.00 | 3,500.00 | 120,493.27 |
| 16/07/2024 | BY CLG.SUBHASH RAMKISAN TAKLE | 000000330675 | 0.00 | 3,500.00 | 123,993.27 |
| 16/07/2024 | BY CLG. RAJASHRI PANDHARINATH PAWAR | 000000278740 | 0.00 | 3,500.00 | 127,493.27 |
| 16/07/2024 | BY CLG. VIJAY RAMRAO PANDE | 000000237949 | 0.00 | 3,500.00 | 130,993.27 |
| 16/07/2024 | BY CLG. SURESH MADHAVRAO MUNDHE | 000000314981 | 0.00 | 3,500.00 | 134,493.27 |
| 16/07/2024 | BY CLG. SANJIVKUMAR SURYAKANT PANCHAL | 000000218574 | 0.00 | 3,500.00 | 137,993.27 |
| 16/07/2024 | BY CLG. ASHWIN PURUSHOTTAM RANJANIKAR | 000000024789 | 0.00 | 3,500.00 | 141,493.27 |
| 16/07/2024 | BY CLG. MAHESH BHAUSAHEB THORAT | 000000316492 | 0.00 | 3,500.00 | 144,993.27 |
| 16/07/2024 | BY CLG. NITIN PANDHRINATH MALEGAONKAR | 000000298809 | 0.00 | 3,500.00 | 148,493.27 |
| 16/07/2024 | BY CLG. KULKARNI GANESH DINKARRAO | 000000276152 | 0.00 | 3,500.00 | 151,993.27 |
| 16/07/2024 | BY CLG. YEDLE DATTATREYA LAXMAN | 000000322323 | 0.00 | 3,000.00 | 154,993.27 |
| 16/07/2024 | BY CLG. NALGORKAR MANJUSHA MOTIRAM | 000000344524 | 0.00 | 3,500.00 | 158,493.27 |
| 16/07/2024 | BY CLG. LOMTE RAMKISAN VASANTRAO | 000000271015 | 0.00 | 3,500.00 | 161,993.27 |
| 16/07/2024 | CHQ RETURN CHARGES CHQ NO. 834282 | 000000000000 | 100.00 | 0.00 | 161,893.27 |
| 16/07/2024 | CGST CHQ RETURN CHARGES CHQ NO.834282 | 000000000000 | 9.00 | 0.00 | 161,884.27 |
| 16/07/2024 | SGST CHQ RETURN CHARGES CHQ NO.834282 | 000000000000 | 9.00 | 0.00 | 161,875.27 |
| 18/07/2024 | BY CLG. SANDEEP JAGANNATH JAGTAP | 000000834282 | 0.00 | 3,500.00 | 165,375.27 |
| | | | 118.00 | 48,500.00 | 165,375.27 |

"IF THE CONSTITUENT DOES NOT NOTIFY THE BANK WITHIN SEVEN DAYS FROM DATE OF PRINTING OF ANY DISCRIPANCY IN THE CONTENTS OF THIS STATEMENT OF ACCOUNT THE STATEMENT WILL BE DEEMED AS CORRECT"

# पंडित दीनदयाल शिष्यवृत्ती योजनेचे चेक वाटप करतांना प्राचार्य, प्राध्यापक











## संस्था वर्धापन दिनानिमित्त - व्याख्यानमाला

पंडित दीनदयाल उपाध्यक्ष संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित व्याख्यानमालेचे एक पुष्पगुंपण्याची जबाबदारी महाविद्यालयावरतील आचार्य कुलप्रबोधिनी आयामावर होती. याअंतर्गत प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी "पं. दीनदयाल उपाध्याय यांची एकात्म आर्थिक नीती" या विषयावर मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून माननीय डॉ. सर्जेरावजी ठोंबरे उपस्थित होते तर अध्यक्ष म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष माननीय श्री देवजीभाई पटेल उपस्थित होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ. सुभाष टकले उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ महेश थोरात यांनी करून सुत्रसंचालन डॉ. रामकिसन लोमटे यांनी केले.






## सहविचार सभा २०२४ – २५
## दिनांक २६,  २७  व २८ जुलै २०२४

- सूत्रसंचालन : श्री कैलास कुबेर यांनी केले.
- महाराष्ट्र गीत : श्री. ज्ञानेश्वर थोरे यांनी म्हटले.
- पाहुण्यांचा परिचय : श्री. अंकुश साळवे यांनी करून दिला.
- मान्यवरांचे आभार : श्री संदेश सोनवणे यांनी मानले.
- सत्राची जबाबदारी : स्वामी ब्रम्हानंद विद्यालय, पिंप्री राजा

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था अंतर्गत आर्य चाणक्य आचार्यकुल प्रबोधिनी आयोजित, सहविचार सभा २०२४-२५ चे आयोजन पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या अचार्यकुल प्रबोधिनीचे प्रमुख श्री महेश कुलकर्णी यांच्या नेतृत्वात  श्री संत सावता गुरुकुल, फुलंब्री ता. फुलंब्री जिल्हा. छ. संभाजीनगर याठिकाणी दिनांक २६, २७ व २८ जुलै २०२४ दरम्यान करण्यात आले. प्रस्तुत सहविचार सभेची सुरुवात २६ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ७:३० वाजता झाली. याप्रसंगी बिजभाषक म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, मा. श्री. निवृत्ती गावंडे, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, मा. श्री. देवजीभाई पटेल, तर अध्यक्ष म्हणून मा. श्री. सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती लाभली. बोलत असताना श्री गावंडे म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या तत्वविचारांना उजाळा देत असताना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत आपले ज्ञान कसे पोहचवता येईल याचा विचार व्हावा. तसेच समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा त्यात विद्यार्थी विकास, समाज, गाव आणि राष्ट्र विकास पुढे ठेवून आपण काम करावे. ही भूमिका मांडली. यासोबतच वैज्ञानिक दृष्टीची वाढ विध्यार्थ्यांमध्ये कशी वाढविता येईल ज्यामुळे विध्यार्थ्यांची व शिक्षकांची गुणवत्ता व क्षमता वाढेल. व विद्यार्थी संस्कारक्षम बनेल याचा विचार व्हावा. असे मत मांडले. शिक्षकांनी गुणवत्ता अधिष्ठानाची कास धरली पाहिजे. यासोबतच नवोपक्रमाला चालना देण्याचा प्रयत्न करावा असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप मा. श्री. सर्जेराव ठोंबरे यांनी केला. सर म्हणाले की,
मन, मस्तीष्क आणि मेंदू यांचा विकास होणे म्हणजे सर्वांगीण विकास होणे होय. यासाठी विध्यार्थ्यांचा मैदानी विकास घडवून आणावा लागेल. तसेच कुटुंब संस्कार महत्त्वाचा आहे. त्याकडेही आपले लक्ष असावे. पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे. याचाही विचार आपण करावा. असे मत व्यक्त केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, संत सावता प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, श्री. अप्पासाहेब चव्हाण व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका, श्रीमती, कल्पना उरणकर तसेच या सभेसाठी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व संस्कार केंद्राचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

- दिनांक २७ जुलै २०२४
- उदघाटन सत्र
  - सत्राचे सूत्रसंचालन : श्री. सोनाजी गायकवाड यांनी केले.
  - पाहुण्यांचे आभार : श्री. रवी सुरडकर यांनी मानले.
  - सत्राची जबाबदारी : स्वामी विवेकानंद विद्यालय, चित्तेपिंपळगाव

दिनांक २७ जुलै २०२४ रोजी सकाळी संचालन सराव, खेळ व शाखा घेण्यात आली. तसेच या दिवशीच्या उदघाटन सत्रासाठी उदघाटक म्हणून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, छ. संभाजीनगर येथील मा. डॉ. श्री. उज्वल करवंदे उपस्थित राहिले. संस्थेचे निमंत्रित सदस्य, मा. डॉ. श्री. प्रदीप जब्दे यांची प्रमुख उपस्थिती होती. तर अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, मा. श्री. देवजीभाई पटेल, संचालक, मा. श्री. सर्जेराव ठोंबरे, संस्थेचे सचिव, श्री. निवृत्ती गावंडे तसेच आर्यचाणक्य विद्यालयाचे कार्यवाहक श्री वामनरावजी देशपांडे यांची उपस्थित होती.

'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर बोलत असताना श्री उज्वल करवंदे म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ही व्यापक अशी संकल्पना आहे. घेतलेल्या ज्ञानाचे उपयोजन करून आपलं जीवन सुंदर बनविणे हा उद्देश घेऊनच प्रस्तुत धोरण राबविण्याचा प्रयत्न आहे. यात स्वतः शोध घेऊन मुलांनी शिकले पाहिजे हा विचार या धोरणाचा आहे. आजचा नागरिक हा जगाचं नेतृत्व करणारा युवक घडविणे, भारतीय शिक्षणाची उपासना पूर्ण करणे, शिक्षणाचं भारतीयत्व जतन करणे, हा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आत्मा आहे. भारतीय भाषेला महत्त्वपूर्ण स्थान देणं ही या धोरणाची ध्येय आहे. तसेच हे धोरण समन्यायी असेल आणि ते सर्वांपर्यंत कसे पोहचेल याचा विचार केला गेला आहे. पुढे बोलत असताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची काही वैशिष्ट्ये सांगितली. त्यात विविधता आणि स्थानिक परिस्थिती, समता व सर्वसमावेशकता, समाज सहभाग, तंत्रज्ञानाचा वापर, संकल्पनांतून आकलन निर्माण करणे, चिकित्सक विचार आणि सर्जनशीलता निर्माण करणे. या विविध वैशिष्ट्यांच्या आधारे विवेचन केले. तसेच विद्यार्थ्यांचे सामाजिकीकरण व शारीरिक विकास घडवून आणणे हा विचार या धोरणाचा आहे.

मुलांचे बौद्धिक आणि भावनिक मूल्यमापन करणे या शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून साध्य होणार आहे. असे मत व्यक्त केले.

प्रमुख उपस्थितीत बोलत असताना डॉ. प्रदीप जब्दे म्हणाले की, सामाजिक आणि शैक्षणिक बाबतीत आज बदल घडत आहेत. विद्यार्थी आणि पालक यांना घेतलेल्या शिक्षणाबद्दल आनंद वाटला पाहिजे. ग्रामीण भागात शिक्षण पोहचलेले नाही. त्यासाठी समान शिक्षणाची भूमिका घेणे आवश्यक आहे. यानुसार आजची शिक्षण व्यवस्था आणि त्यातील अपेक्षित बदल यावर सखोल असे विवेचन केले आहे.

अध्यक्षीय समारोप पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष, श्री. देवजीभाई पटेल यांनी केला. बोलत असताना ते म्हणाले की, जुनी शिक्षण पद्धती ही संस्कारक्षम होती. शिक्षणातून संस्कार घडविण्याचे काम फक्त शिक्षकच करू शकतो. असे मत व्यक्त केले. यावेळी संस्थेअंतर्गत असलेल्या सर्व संस्कार केंद्रांचे  प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

➢ सत्र दुसरे

- सूत्रसंचालन : श्री. संतराम मोरे यांनी केले.
- मान्यवरांचे आभार : श्री कैलास व्यवहारे यांनी मानले.
- सत्राची जबाबदारी : श्री रामेश्वर विद्यालय, वाघोळा

दुसऱ्या दिवशीच्या दुसऱ्या सत्रात 'संघ व सेवा कार्य' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी आर्य चाणक्य विद्याधाम, जटवाडा येथील कार्यवाह, श्री. वामनराव देशपांडे उपस्थित होते. यावेळी अध्यक्षस्थानी फुलंब्री तालुका संघचालक मा. श्री. देवनाथ ईधाटे उपस्थित होते.

संघ व सेवाकार्य या विषयावर बोलत असताना म्हणाले की, संघाची विचारसरणी काय? आहे, त्या कार्याची ओळख करून घेणे आवश्यक आहे. तसेच या कार्याशी समरस होण्याचा प्रयत्न करावा. संघांचे काम हे शुद्ध सात्विक असे आहे. त्यामुळे या परिवारात काम करणाऱ्या माणसांची चरित्र वाचली पाहिजेत. याहीपलीकडे जाऊन विचार केला तर संघांचे काम प्रसिद्धीपासून दूर असते. हे लक्षात घ्यावे. ज्या क्षेत्रात सामाजिकतेच्या, समरसतेच्या विचार व विकासाची भूमिका असते. त्या क्षेत्रात शुद्धपणे संघ काम करतो. तसेच निरपेक्ष असा सेवाभाव संघाच्या कार्यात दिसून येतो. यानुषंगाने आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समरोप श्री. देवनाथ ईधाटे यांनी केला.

➢ सत्र तिसरे

- सूत्रसंचालन : श्री. बळीराम मुरमे यांनी केले.
- मान्यवरांचे आभार : श्री. बळीराम मुरमे यांनी मानले.
- सत्राची जबाबदारी : संत गाडगेबाबा आश्रमशाळा, अंजनडोह

दुसऱ्या दिवशीच्या तिसऱ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड सिनेट सदस्य, मा. श्री. दिपक मोरताळे उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी सिल्लोड जिल्हा सहकार्यवाह, मा. श्री. गोरक्षनाथ मंडळ यांची उपस्थिती होती.

'लोकसहभागातून पाणी, माती, हवा व जैविक शुद्धीकरण' या विषयावर बोलत असताना श्री. मोरताळे म्हणाले की, आपण वापरत असणारे पाणी शुद्ध हवे. शहरातील नाले दुर्गंधी करत असताना दिसतात यावर उपाय योजना करून ही दुर्गंधी नष्ट होऊ शकते. हे पाण्यावरील वेगवेगळ्या प्रयोगाने सिद्ध होते. त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सूक्ष्मजीव एन्झाईम्स हे सांडपाणी आणि इतर कचरा इत्यादींचे विघटन करतात. सुमारे ४०००प्रकारचे एन्झाईम्स आहेत आणि १०% देखील आयडेंटिफाय गेले नाहीत. एन्झाइम्स उत्प्रेरक आहेत आणि विघटन प्रक्रियेला प्रोत्साहन देतात. प्रदूषणांमध्ये कार्बन , नायट्रोजन, हायड्रोजन, नायट्रोजन डाय ओक्साईड,नायट्रेट, सल्फर डाय ओक्साईड, एच २ एस, सारखे इतर घटक प्रदूषित पाण्यात व डम्पिंग कचऱ्यात असतात.बायो-एन्झाइम प्रदूषित पाण्यातील अमोनिया, नायट्रोजन, फॉसफरस कमी करतात. पाण्याचे BOD, COD कमी करून पाण्यातील ऑक्सिजन DO मोठया प्रमाणात वाढवतो. एरोबिक तसेच एनारोबिक स्थितीत बायो-एन्झाइम अत्यंत प्रभावी आहे. शेतीसाठी बायो-एन्झाइम, बायो-एन्झाइम चे इतर उपयोग याबद्दल माहिती दिली. अध्यक्षीय समारोप श्री गोरक्षनाथ मंडळ यांनी केला.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, संत सावता प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, श्री अप्पासाहेब चव्हाण व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका, श्रीमती, कल्पना उरणकर तसेच या सभेसाठी संस्थेअंतर्गत येणाऱ्या सर्व संस्कार केंद्राचे प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

➢ सत्र चौथे

- सूत्रसंचालन : श्री गजानन हरकळ यांनी केले.
- मान्यवरांचे आभार : श्री बनकर यांनी मानले.
- सत्राची जबाबदारी : संत तुकाराम विद्यालय, शिंगी

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था अंतर्गत आर्य चाणक्य आचार्यकुल प्रबोधिनी आयोजित सहविचार सभेच्या २७ जुलै २०२४ या दिवशीच्या चौथ्या सत्रात 'काळानुरूप शिक्षण व्यवस्था' या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी मा. श्री मंगेश करंदीकर उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी सिल्लोड जिल्हा कार्यवाह, मा. श्री केतनजी कल्याणकर उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे सचिव, श्री निवृत्ती गावंडे, संचालक, डॉ. सर्जेराव ठोंबरे, निमंत्रित सदस्य, डॉ. प्रदीप जब्दे उपस्थित होते. बोलत असताना श्री मंगेश कल्याणकर म्हणाले की, मुलांनी कौशल्याधिष्ठीत शिक्षणासाठी कुणाची तरी मदत घेतली पाहिजे. येणाऱ्या काळात शिक्षणाने किती युवक संस्कारक्षम घडतील याचा विचार करावा. मुलांना मिळालेलं ज्ञान परीक्षेसाठी नाही तर आयुष्य जगण्यासाठी उपयोगी पडलं पाहिजे.

काळानुरूप शिक्षणाचा विचार करत असताना मुलांनीही बदलले पाहीजे. शाळेत विध्यार्थ्यांना आवड निर्माण होणारे कार्यक्रम साजरे केले जावेत. त्यात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सामावून घेणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाच्या बदलत्या गोष्टी खूपच पुढे गेलेल्या आहेत. त्यामुळे शिक्षणात बदल घडवून आणावा लागत आहे. सृजनशीलता निर्माण होणारे शिक्षण मुलांना मिळाले पाहिजे. तसेच विध्यार्थ्यांच्या क्षमता वाढीस कशा लागतील याचा प्रयत्न करावा. असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप श्री केतनजी कल्याणकर यांनी केला.

➢ सांस्कृतिक कार्यक्रम

सायंकाळच्या सांस्कृतिक सत्रात विविध संस्कार केंद्रानी आपले कलाविष्कार सादर केले. यात भजन, भारुड, कव्वाली, पोवाडा, कवन प्रहसन सादर करण्यात आले. यावेळी सर्व संस्कार केंद्रातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या संगीत व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी श्री सुरेश पठाडे, श्री बळीराम थोरे, श्री अंकुश साळवे, श्री अमोल साळवे, श्री उमेश मुलगीर, श्री दिनेश औटे यांनी परिश्रम घेतले.

➢ दिनांक २८ जुलै २०२४

सहविचार सभेच्या तिसऱ्या दिवसाची सुरुवात योग, प्राणायाम व सूक्ष्म व्यायामांनी झाली.

- सूत्रसंचालन : श्री कैलास कुबेर यांनी केले.
- मान्यवरांचे आभार : श्री ताकदुणे यांनी मानले.
- सत्राची जबाबदारी : श्री जुन्नेश्वर विद्यालय, वरुड

दिनांक २८ जुलै २०२४ रोजीच्या पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, छ. संभाजीनगर येथील अधिव्याखता, मा. श्री रवी कोरडे यांची उपस्थिती लाभली.

अध्यक्षस्थानी पी. ई. एस. मॉडर्न इंजिनिअर महाविद्यालयाच्या उपप्राचार्या, प्रोफेसर डॉ. सौ. सुहासिनी नाईक ईटकर उपस्थित राहिल्या.

'मानवी जीवनातील साहित्याचे स्थान' या विषयावर श्री रवी कोरडे म्हणाले की, शिक्षकलेली माणसंच मोठी असतात असं नाही, तर जेव्हा जेव्हा माणसाला बोलावं वाटतं त्यावेळेसच खऱ्या अर्थाने साहित्याची निर्मिती होत असते. त्यामुळे साहित्याचा संबंध लेखन वाचनाशीच असतो असे समजू नये. तर तो माणसाशी आहे. माणसांमध्ये संवेदना निर्माण करणे, माणसाचं जगणं निर्धारित करणं, एकाच आयुष्यात कितीतरी आयुष्य जगता येणं या संबंध बाबींशी साहित्याचा संबंध येत असतो. तसेच साहित्यात काळाच्या सीमा तोडण्याची ताकत आहे. यासोबतच जगण्यातील सकारात्मकता, दुर्दम्य आशावाद व स्वतःच्या अस्तित्वाचं भान देणे. हे साहित्याचे काम आहे. माणसं ही प्रत्यक्षापेक्षा प्रतिमेच्या शोधात असतात. असे मत व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप डॉ. सुहासिनी नाईक ईटकर यांनी केला. त्यांनी मूल्यधिष्टीत शिक्षणाची आज गरज भासत आहे. त्याचाही आपण सर्वांनी विचार करावा. ही अपेक्षा व्यक्त केली.

➢ गटचर्चेचे आयोजन

दुसऱ्या सत्रात 'आपल्या दैनंदिन कामातील नवोपक्रम व उणीवा' या विषयावर गटचर्चेचे आयोजन करण्यात आले. यात १ ली ते ४ थी, ५ वी ते ८ वी, ९ वी ते १२ वी, पदवी, मुख्याध्यापक, लिपिक/सेवक परिचर यांची गटनिहाय चर्चा घडवून आणून या चर्चेचे निवेदन अनुक्रमे मुख्याध्यापक, श्री दीपक साळवे, श्री. सैनाजी सोरमारे, श्रीमती, एस.एम.करोडकर, डॉ. पांडुरंग कल्याणकर, मुख्याध्यापक, श्री.दिनेश देशपांडे, श्री. सचिन सुरंगळीकर यांनी केले.

➢ समारोप सत्र

- सूत्रसंचालन : प्रा.डॉ.मंजुषा नळगीरकर
- महाराष्ट्र गीत : श्री. सुरेश पठाडे यांनी म्हटले.
- मान्यवरांचा परिचय : प्रा. डॉ. महेश थोरात
- मान्यवरांचे आभार : प्रा. डॉ. सुरेश मुंढे यांनी मानले.
- समारोप सत्राची जबाबदारी : श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

सहविचार सभेच्या समारोप सत्रात प्रमुख वक्ते म्हणून छ. संभाजीनगर येथील उच्च न्यायालयातील प्रसिद्ध कायदेतज्ज्ञ मा. अडव्होकेट, श्री संजीव देशपांडे यांची उपस्थिती होती. तर प्रस्तुत सत्राच्या

अध्यक्षस्थानी पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, मा. श्री. हरिभाऊ बागडे (नाना) उपस्थित होते.

बोलत असताना श्री संजीव देशपांडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्या संविधानासाठी परिश्रम घेतले त्या संविधानासाठी नागरिकांनी सर्वप्रथम संविधान साक्षर बनणे आवश्यक आहे. त्यासाठी संविधानाचा अभ्यास करावा. कारण निरक्षर लोकांमुळेच संविधानाला धोका आहे. हे समजून घ्यावे. कारण भारतीय संविधान हा एक राष्ट्रग्रंथ आहे. या संविधानाने सामाजिक समरसता निर्माण करण्याचे काम केले आहे. बंधुता निर्माण केली आहे. यामुळे लोकशाहीवादी राष्ट्र निर्माण होईल. आपणाला समानता आणावी लागेल. राष्ट्राला मजबूत करायचे असेल तर संविधानाला समजून घ्यावे लागेल. राज्यघटनेमध्ये मूलभूत अधिकारांसोबत कर्तव्याचीही जाणीव होताना दिसते. हीच कर्तव्य व मूलभूत अधिकार याची माहिती विद्यार्थ्यांना द्यावी. त्यांच्यामध्ये राष्ट्रगीताबाद्दल आदर कसा निर्माण होईल याच्यासाठीही प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे भारतीय संविधानाचा प्रचार आणि प्रसार जास्तीत जास्त करावा.

अध्यक्षीय समारोप करत असताना मा. नाना म्हणाले की, संविधानाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती व घटना सांगितल्या पाहिजेत. संस्कृती संवर्धन या संदर्भाने चर्चा केली. तसेच विध्यार्थ्यांची बौद्धीक क्षमता वाढीस कशी लावता येईल याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा. याहीपुढे विद्यार्थ्यांमध्ये कोणकोणते गुण असावेत याबद्द्लही छान अशी माहिती दिली.

या सत्रात संस्थेतील निवृत्त शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा नानांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच गटचर्चेचे वृत्त निवेदन करण्यात आले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष, देवजीभाई पटेल, सचिव, निवृत्ती गावंडे, संचालक, श्री दिनू काका गावंडे, श्री सर्जेराव ठोंबरे, श्री दामूअण्णा नवपुते, महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, श्री नारायण बाभुळगाकर, फुलंब्री नगरपंचायतचे नगराध्यक्ष, श्री सुहासभाऊ सिरसाट यांची उपस्थिती होती.

यावेळी संस्थेच्या संस्कार केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**डॉ. महेश थोरात**

**प्र. विभाग** प्रमुख




# समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा – निवृत्ती गावंडे

**फुलंब्री : प्रतिनिधी**


समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा त्यात विद्यार्थी विकास, समाज, गाव आणि राष्ट्र विकास पुढे ठेवून आपण काम करावे, असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे यांनी बोलतांना केले.



फुलंब्री शहरातील श्री संत सावता गुरुकुल येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था अंतर्गत आर्य चाणक्य आचार्यकुल प्रबोधिनी आयोजित सहविचार सभा २०२४-२५ चे आयोजन दि. २६, २७ व २८ जुलै २०२४ दरम्यान करण्यात आले. प्रस्तुत सहविचार सभेची सुरुवात दि.२६ रोजी सायंकाळी ७:३० वाजता झाली. याप्रसंगी बिजभाषक म्हणून पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव निवृत्ती गावंडे, पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष देवजीभाई पटेल, तर अध्यक्ष म्हणून सर्जेराव ठोंबरे यांची उपस्थिती लाभली.

पुढे बोलताना श्री गावंडे म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या तत्वविचारांना उजाळा देत असताना समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत आपले ज्ञान कसे पोहचवता येईल याचा विचार व्हावा. तसेच समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा त्यात विद्यार्थी विकास, समाज, गाव आणि राष्ट्र विकास पुढे ठेवून आपण काम करावे. ही भूमिका मांडली. यासोबतच वैज्ञानिक दृष्टीची वाढ विध्यार्थ्यांमध्ये कशी वाढविता येईल ज्यामुळे विध्यार्थ्यांची व शिक्षकांची गुणवत्ता व क्षमता वाढेल. व विद्यार्थी संस्कारक्षम बनेल याचा विचार व्हावा. असे मत मांडले. शिक्षकांनी गुणवत्ता अधिष्ठानाची कास धरली पाहिजे. यासोबतच नवोपक्रमाला चालना देण्याचा प्रयत्न करावा असे मत व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे आभार संदेश सोनवणे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास कुबेर यांनी केले. महाराष्ट्र गीत ज्ञानेश्वर थोरे यांनी म्हटले. तर पाहुण्यांचा परिचय अंकुश साळवे यांनी करून दिला.




**डॉ. महेश थोरात**

**प्र. विभाग प्रमुख**